# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे**
**कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे**
**दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१**
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेसनोट क्रमांक २४५/२०२४** **दिनांक-०१/०७/२०२४**

## "चारचाकी कारची काच फोडुन त्यामध्ये ठेवलेली पैशांची बॅग चोरीचे गुन्हे करणाऱ्या सराईत आरोपीतास अटक करण्यात पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश."

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २०/०६/२०२४ रोजी सकाळी ०९.४५ ते १०.४५ वाचे सुमारास यातील फिर्यादी श्री. सचिन नागेद्र दुबे, रा. विरार पश्चिम ता. वसई, जि. पालघर यांनी त्याचे मालकीची मारुती सुझुकी कंपनीची ॲक्सल ०६ कार क्र. एम एच ४८ सी.टी ०९१२ हिच्या मध्ये पाठीमागील सिट वर काळया रंगाची बॅग ठेवली होती. सदर बॅगमध्ये फिर्यादी यांची ४ लाख १० हजार रुपये रोख रक्कम होती. यांनी सदर कार जी.के.पी इंटरप्रायजेस प्रा.लि, चॅम्पीयन कंम्पाऊड, सोपारा फाटा, ता.वसई जि.पालघर येथे रोडचे कडेला पार्क करुण ठेवली होती. सदर कारच्या चालकाच्या पाठीमागील बाजुचे पाठीमागील काच कोणीतरी अज्ञात इसमाने फोडुन कारच्या पाठीमागील शिटवर ४,१०,०००/- रुपये रोख रक्कम असलेली बॅग चोरी करुन चोरुन नेलेबाबत दि. २०/०६/२०२४ रोजी पेल्हार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ५५७/२०२४ भा.द.वि.स.कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी अंमलदार यांना गुन्हयाचा तपास करण्याबाबत सुचना देऊन सदर गुन्हयातील आरोपीत यांचा शोध घेणेबाबत आदेशित केले होते. सदर आदेशान्वये गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या अधिकारी अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन, परिसरातील सिसीटीव्ही फुटेज चेक करुन सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत असलेल्या संशयीत ५ ते ७ इसमांचा सीसीटीवी फुटेजच्या आधारे शोध घेत असतांना सदर आरोपीत हे सोपाराफाटा, येथुन नालासोपारा रेल्वे स्टेशन येथे जात असतांना त्यांचा सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पाठलाग करुन त्याचा शोध घेत असतांना आरोपीत हे नालासोपारा रेल्वे स्टेशन येथुन रिक्षात बसुन विरार रेल्वे स्टेशन बाजुकडे जातांना दिसले. म्हणुन त्यांचा विरार रेल्वे स्टेशन परिसरात शोध घेतला असता आरोपीत हे विरार रेल्वे स्टेशन येथुन गुजरात बाजुकडे जाणाऱ्या ट्रेन मध्ये बसत असल्याचे दिसुन आल्याने विरार रेल्वे स्टेशन ते उमरगाव रेल्वे स्टेशन पावेतोचे सीसीटीव्ही फुटेज चेक केले असता आरोपीत हे उमरगाव रेल्वे स्टेशन येथे ट्रेन मधुन उतरत असल्याचे दिसुन आल्याने उमरगाव येथिल सीसीटीव्ही फुटेज तपासुन आरोपीत निष्पन्न यांना निष्पन्न केले आहे. आरोपीत यांच्याबाबत गुप्त बातमीदार व तांत्रिक माहितीच्या आधारे उमरगाव येथे शोध घेत असतांना सदर गुन्हयातील आरोपीत १) बबलु फकीरा जाधव ऊर्फ किशन वय-४५ वर्ष रा. उमरगावं ता. उमरगांव जि. वलसाड यांस ताब्यात घेवुन त्यांच्याकडे गुन्हयाचे अनुषंघाने तपास करता

त्यांचा गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास गुन्हयात दि.२६/०६/२०२४ रोजी अटक केली आहे. आरोपीत यांच्याकडे गुन्हयाचे अनुषंगाने तपास करता त्यांने पेल्हार पोलीस ठाणे गु.र.क्र. ५३९/२०२४ भादविस कलम ३७९ प्रमाणे गुन्हा केल्याचा निष्पन्न झाले असुन आरोपीत यांच्याकडुन सदर गुन्हयामध्ये चोरी केलेल्या रोख रक्कमेपैकी १,१६,०००/- रुपये रोख रक्कम हस्तगत करण्यात आली असुन आरोपीत यांच्याकडुन खालील गुन्हे उघडकीस आले आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नंबर, कायदा व कलम |
|---|---|---|
| १ | पेल्हार | गु.रजि.नं. I ५५७/२०२४,भा.दं.वि.सं.कलम-३७९,३४ प्रमाणे (मुळ गुन्हा) |
| २ | पेल्हार | गु.रजि.नं. I ५३९/२०२४, भा.दं.वि.सं.कलम- ३७९ प्रमाणे, |

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक, (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/सोपान पाटील, पोउपनि/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, पोअं/मिथुन मोहिते, रवि वानखेडे, राहुल कर्पे, किरण आव्हाड, निखिल मंडलिक, अभिजीत नेवारे, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

---------00000---------